**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

# शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०१७ सत्रासाठी प्रवेश सुचना

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०१७ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया पध्दतीने (Centralized Online Admission Process) करण्यांत येत असून दि. १९ जून, २०१७ ते ९ जूलै, २०१७ पर्यंत प्रवेशअर्ज निश्चित करुन विकल्प व प्राधान्य स्विकारण्यांत आले आहेत. अंतिम गुणवत्ता यादी दि. १५ जूलै, २०१७ रोजी प्रवेश संकेतस्थळावर प्रकाशित करण्यांत आली आहे. प्रवेशप्रकीयेचे पुढील वेळापत्रक खालीलप्रमाणे देण्यांत येत आहे.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक - प्रवेश फेरिनिहाय निवड यादी प्रकाशित करणे, प्रवेश निश्चिती, विकल्प सादर करणे व समुपदेशन फेरी**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रियेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१.०** | **पहिली प्रवेश फेरी** | | |
| १.१ | पहिल्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | २७ जूलै, २०१७, सांय. ५.०० वाजता | |
| १.२ | पहिल्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पंसतीक्रमाच्या **पहिल्या विकल्पानुसार** जागा मिळाल्यास उमेदवाराला प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या ते चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र. २ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या दुसऱ्या ते चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | २८ जूलै, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | ०३ ऑगस्ट, २०१७<br>सांय.१.०० वाजेपर्यंत |
| **२.०** | **दुसरी प्रवेश फेरी** | | |
| २.१ | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जूनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | ०१ ऑगस्ट, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | ०३ ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| २.२ | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | ०६ ऑगस्ट, २०१७, सांय. ५.०० वाजता | |
| २.३ | दुसऱ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या **पहिल्या तीन विकल्पांपैकी** कोणत्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र. ४ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | ०७ ऑगस्ट, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | १० ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| **३.०** | **तिसरी प्रवेश फेरी** | | |
| ३.१ | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जूनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | ०७ ऑगस्ट, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | १० ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ३.२ | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | १३ ऑगस्ट, २०१७, सांय. ५.०० वाजता | |
| ३.३ | तिसऱ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंती क्रमांकाच्या **पहिल्या पाच विकल्पांपैकी** एका विकल्पांनुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या चौथ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होता येणार नाही.<br>ज्या उमेदवारांना विकल्प क्र.६ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या चौथ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | १४ ऑगस्ट, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | १७ ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| **४.०** | **चौथी प्रवेश फेरी** | | |
| ४.१ | चौथ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जूनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | १४ ऑगस्ट, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | १७ ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ४.२ | चौथ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | २० ऑगस्ट, २०१७, सांय. ५.०० वाजता | |

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रियेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| ४.३ | चौथ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पंसतीक्रमाच्या कुठल्याही **एका विकल्पांनुसार जागा** मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. | २१ ऑगस्ट, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | २४ ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| **५.०** | **शासकीय औ.प्र. संस्थांसाठी संस्थास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| ५.१ | **फक्त शासकीय औ.प्र.संस्थातील** चौथ्या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतर शिल्लक राहिलेल्या जागा संबंधीत शासकीय औ.प्र. संस्थाना संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करणे. | २६ ऑगस्ट, २०१७, स. ११.०० वाजता | |
| ५.२ | औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | २८ ऑगस्ट, २०१७<br>स.८.०० वाजेपासून ते सर्व उपस्थित उमेदवारांची हजेरी नोंदविण्यापर्यंत | |
| ५.३ | हजेरी नोंदवीलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे. | २८ ऑगस्ट, २०१७, सांय.५.०० वाजेनंतर | |
| ५.४ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.<br>सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित शासकीय औ.प्र.संस्थेत **त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.** उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | २९ ऑगस्ट, २०१७<br>स.८.०० वाजेपासून | ३० ऑगस्ट, २०१७<br>सांय.५.०० वाजेपर्यंत |
| ५.५ | रिक्त राहिलेल्या जागांसाठी नव्याने उमेदवारांची हजेरी नोंदविणे व संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे | ३१ ऑगस्ट, २०१७<br>स.८.०० वाजेपासून स. ११.०० वाजेपर्यंत | |
| ५.६ | गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलविणे, प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे व प्रवेश निश्चिती करणे | ३१ ऑगस्ट, २०१७<br>दु.१२ वाजेपासून ते अंतिम उमेदवारापर्यंत | |
| **६.०** | **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| ६.१ | खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे एकूण प्रवेश क्षमतेच्या व्यवसाय निहाय २०% जागा) व चौथ्या प्रवेश फेरीनंतर खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधीत खाजगी औ.प्र.संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध होतील | २८ जूलै, २०१७<br>स.९.०० वाजेपासून | ३१ ऑगस्ट, २०१७<br>सांय. ७.०० वाजेपर्यंत |
| ६.२ | खाजगी औ.प्र.संस्थांना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध जागांचा तपशील प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध राहील | | |
| ६.३ | ज्या उमेदवारांची खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संस्था स्तरावरील जागांवर प्रवेश घेण्यांची इच्छा आहे त्यांनाही त्यांची तपशिलवार माहितीसह प्रवेश संकेत स्थळावर नोंदणी (Registration) करावी लागेल | | |
| ६.४ | नोंदणीकृत उमेदवारांनी ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावावयाचा आहे त्या संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन सर्व मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर प्रवेश प्रक्रीया पूर्ण करावी | | |

टिप :

१. **पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) अंतर्गत राज्यात असलेल्या २५० औ.प्र.संस्थांमधील ठराविक अभ्यासक्रमातील २०% जागा या माहिती पुस्तिकेत दिलेले "विशेष प्रशिक्षण शुल्क" आकारुन गुणवत्तेनुसार भरण्यांत येतील. त्या जागांसाठी इच्छुकांना Online प्रवेश प्रक्रीयेत स्वतंत्र विकल्प (Option) देण्याची मुभा राहणार आहे. उदा. Fitter (IMC), Welder (IMC) etc. उमेदवारांनी अशा जागांसाठी विकल्प सादर करण्यापूर्वी माहितीपुस्तिकेत प्रशिक्षण शुल्काबाबत (मुद्दा क्र. १५.१) माहिती वाचावी**

२. प्रवेश प्रक्रिया पुर्ण झल्यानंतर ज्या शासकीय औ. प्र. संस्थांमधील व्यवसायांत एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाले असतील त्या व्यवसायातील प्रवेशित उमेदवारांना त्याच संस्थेत इतर व्यवसायात किंवा जवळच्या दुसऱ्या शासकीय औ.प्र. संस्थेतील संबंधित व्यवसायात सामावून घेण्यांत येईल (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. २२.१)

३. **संपर्ण प्रवेश प्रक्रिये बाबत उमेदवारांना वेळोवेळी SMS व्दारे कळविण्यांत येईल तथापि उमेदवारांनी आपला अद्यावत भ्रमण ध्वनी क्रमांक (Mobile Number) ऑनलाइन प्रवेश अर्जात “Primary Mobile Number” म्हणुन नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर भ्रमण ध्वनी क्रमांक प्रवेश प्रक्रिये दरम्यान बदलू नये.**

४. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत असून केंद्रीय पध्दतीत उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यांत येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.

५. राज्यातील सर्व शासकीय औ.प्र.संस्था व मान्यता प्राप्त खाजगी औ.प्र.संस्थांची यादी http://admission.dvet.gov.in, www.dvet.gov.in तसेच www.ncvtmis.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. तरी प्रवेशोच्छुक सर्व उमेदवारांनी सदर संकेतस्थळांना एकवेळ अवश्य भेट दयावी.

६. **वरील प्रवेश वेळापत्रक सुचक दर्शक असुन त्या बदल संभवतो. अद्यावत प्रवेश वेळापत्रक प्रवेश संकेतस्थळावर व सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थां उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच नोंदणीकृत उमेदवारांना SMS व्दारे कळविण्यात येईल.**

७. **प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व प्रवेशीत उमेदवारांना परीक्षेस बसण्यासाठी आधार क्रमांक सक्तीचा करण्यात आलेला असल्याने सर्व उमेदवारांनी आधार क्रमांक प्रवेशानंतर संबंधीत संस्थेत दि. १० सप्टेंबर, २०१७ पुर्वी नोंदवावा.**

स्थळ: मुंबई
दिनांक.: ३१ जूलै, २०१७

http://admission.dvet.gov.in

Sd/-
(अनिल म. जाधव)
प्र. संचालक